# श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान

## *महाशिवरात्री*

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### “दर्शन बुक करणे”

सत्संगादरम्यान श्रीगुरुमाईंनी एका सात वर्षाच्या मुलीबरोबर घडलेला एक प्रसंग सांगितला. ही मुलगी तिच्या आईवडलांसोबत श्री मुक्तानंद आश्रमात आली होती, जे सेवा करण्यासाठी आश्रमात आले होते. तिथे येताच तिने आईवडलांना विचारले, “तुम्ही श्रीगुरुमाईंबरोबर दर्शन बुक केले आहे का?”

श्रीगुरुमाईंनी हा प्रसंग सांगितल्यावर, त्यांच्यासह आम्ही सर्वजणही हसलो. श्रीगुरुमाई म्हणाल्या, “मलादेखील ते ऐकायला आवडले. आपण निश्चितच एका नवीन, नवीन जगात आहोत.”

आणि मग त्या म्हणाल्या : “का नाही, होय ना? फक्त बुक करा. दर्शन कोणत्याही वेळी होऊ शकते. तर मग बुक का करू नये?”

श्रीगुरुमाईंबरोबर सत्संगात असताना माझ्याबाबतीत असे नेहमीच घडते, जे यावेळीही घडले, अनेक विचारांनी माझ्या मनात एकाच वेळी गर्दी केली. कित्येक भावना, कित्येक रंग आणि कित्येक प्रतिमा. दर्शन प्राप्त करण्याची त्या लहान मुलीची इच्छा माझ्या मनाला स्पर्श करून गेली. इच्छा व्यक्त करण्याची तिची ती पद्धत मला खूपच मजेदार वाटली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, श्रीगुरुमाई जेव्हा म्हणाल्या, “का नाही?,” तेव्हा माझे मन द्रवले.

होय, ती मुलगी जे म्हणाली, ते खूप मजेदार, गोड आणि मनाला भावणारे होते. आणि त्याचबरोबर मला असेदेखील जाणवले की, श्रीगुरुमाईंनी त्या मुलीला पूर्णपणे समजून घेऊन उत्तर दिले. मला असे जाणवले की, श्रीगुरुमाई त्या मुलीची तीव्र उत्कंठा जाणत होत्या आणि अतिशय काळजीपूर्वक व गांभीर्याने त्या उत्कंठेचे उत्तर देत होत्या.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की, ही मुलगी सात वर्षांची आहे. तिचे संपूर्ण आयुष्य हे अत्यधिक डिजिटल जगात व्यतीत झालेले आहे, ज्यामध्ये कार्यक्षमता आणि सुखसुविधा यांना फार महत्त्व आहे. श्रीगुरुमाई याचे वर्णन करताना म्हणाल्या, “एक नवीन, नवीन जग.” असे जग ज्यामध्ये आपल्याला हव्या असलेल्या बऱ्याचशा गोष्टी फक्त आपल्या बोटांनी काही बटणे दाबताच मिळतात. या दृष्टिकोणातून पाहिल्यास त्या छोट्याशा मुलीने केलेली शब्दांची निवड पूर्णतः

तर्कसंगत होती. तिला जे हवे होते, ते सांगण्यासाठी व मिळवण्यासाठी तिने त्याच शब्दांचा प्रयोग केला जे तिला अवगत होते, तिने त्याच भाषेचा प्रयोग केला, जी तिने तिच्या जीवनात वडीलधाऱ्यांकडून ऐकली होती.

परंतु, यामुळे एक कुतूहल निर्माण करणारा प्रश्न उपस्थित होतो. ते काय *होते,* जे तिला हवे होते? महाशिवरात्रीनंतर काही दिवसांनी, मी श्रीगुरुमाईंशी बोलत होते आणि सत्संगातील हा क्षण मला किती आनंददायी वाटला हे मी त्यांना सांगत होते. श्रीगुरुमाई मला म्हणाल्या की, ज्यावेळी या मुलीने तिची इच्छा प्रकट केली, तोपर्यंत तिने प्रत्यक्षात श्रीगुरुमाईंचे दर्शन घेतलेले नव्हते. त्याचा तिला कोणताही अनुभव नव्हता. कदाचित तिने प्रत्यक्ष दर्शनाविषयी तिच्या आईवडलांकडून ऐकले असावे, परंतु श्रीगुरूंच्या प्रत्यक्ष सान्निध्यात असण्याचा तिचा स्वतःचा असा कोणताही अनुभव तिला नव्हता.

तरीदेखील, तिला अंतरी *माहीत होते* की, तिला दर्शन हवे आहे. तेव्हा, तिच्यासाठी दर्शनाचा अर्थ काय होता? श्रीगुरुमाईंचे दर्शन प्राप्त करणे तिच्यासाठी इतके महत्त्वाचे का होते? दर्शनाविषयी तिने काय कल्पना केली असेल? श्रीगुरुमाईंना भेटणे, त्यांच्या सहवासात असणे, त्यांच्याशी बोलणे, हे सर्व कसे असेल याविषयी तिने काय कल्पना केली असेल? श्रीगुरूंच्या सान्निध्यात असण्याच्या रूपांतरणकारी शक्तीविषयी अजाणतेपणी का असेना, पण तिला काय समजले असेल? तिच्यापाशी सात वर्षे होती—ते तिचे आतापर्यंतचे संपूर्ण आयुष्य होते—ज्यादरम्यान तिने तिची ही उत्कंठा वाढवली असेल. तिला दर्शनाविषयी उपजतच काय समज असेल?

याआधी मी श्रीगुरुमाईंना हे सांगताना ऐकले आहे की, लहान मुले विशेषकरून भगवंताच्या निकट असतात. मला हे या अर्थाने समजले आहे की, लहान मुले आणि आपण ज्या स्रोतापासून जन्माला आलो आहोत त्यापासून ती अजूनही फारशी दूर गेलेली नसतात. त्या लहान मुलीमध्ये दर्शन घेण्याची तीव्र उत्कंठा होती, त्या अनुभवाची तीव्र उत्कंठा होती, जो तिला यापूर्वी कधीच आलेला नव्हता—आणि कदाचित त्या तीव्र उत्कंठेत निहित होती, एक अंगभूत जाण, उपजतच असलेली एक ओळख, एक आंतरिक बोध. ही आपल्याला होणारी ती जाणीव आहे, तो आंतरिक बोध आहे, जो आपल्या अंतरी कदाचित तेव्हा जागृत होतो, जेव्हा उदाहरणार्थ, आपण एखाद्या भव्य, उंच पर्वतासमोर उभे असतो अथवा जेव्हा आपण कोसळणाऱ्या धबधब्याच्या चंदेरी-निळ्या पाण्याला न्याहाळत असतो. ही आपल्या अंतरी होणारी ती जाणीव आहे, जी नृत्य करणारी ज्योत पाहून आपल्या अंतरी एकाएकी स्फुरते, किंवा मग दूरवर पसरलेल्या महासागराला आणि आकाशाला पाहिल्याने आपल्या हृदयात अकस्मात उद्भवते. ही अंगभूत जाण, ही उपजत ओळख, हा आंतरिक बोध आहे, ऐक्याचा; खोलवर अंतरी होणारी ही ती जाणीव आहे ज्यायोगे आपण

अनुभवतो की, आपण घरी परतलो आहोत, आपण त्याच्यापाशी आलो आहोत, ज्याचे आपण सदैवच होतो.

'बुक करणे' आणि 'दर्शन घेणे,' हे दोन्ही वाक्यांश ज्यांचा प्रयोग त्या मुलीने केला, विचार केला तर मनमोहक आहेत, विशेषतः ही पार्श्वभूमी लक्षात घेतल्यास. तिने या दोन्ही वाक्यांशाचा प्रयोग एकत्रपणे केला ते मला फार मोहक वाटले, तिची ती शब्दांची निवड पाहून निश्चितच मलासुद्धा इतर सर्वांप्रमाणे हसू आले. काय संकल्पना आहे, होय ना? की, आपण अगदी त्याचप्रमाणे दर्शन 'बुक' करू शकतो, ज्याप्रमाणे आपण दैनंदिन जीवनातील दुसरी एखादी गोष्ट बुक करू शकतो? की, आपण दर्शनासारखी इतकी बहुमूल्य, इतकी महान गोष्टदेखील आपल्याला हवी तेव्हा, "आपल्या मागणीनुसार" प्राप्त करू शकतो.

तथापि, जसे की, मी याआधी उल्लेख केला आहे, श्रीगुरुमाई याच्या उत्तरादाखल म्हणाल्या, "का नाही?" त्यांनी या लहान मुलीच्या विचाराला किती महत्त्व दिले. या गोष्टीने मला थोडे थांबून विचार करायला भाग पाडले. आणि मग मी स्वतःला तोच प्रश्न विचारला, "का नाही? आपल्याला जेव्हा हवे, तेव्हा आपण दर्शन का *घेऊ नये?*"

आता, आपण *सदेह रूपातील* श्रीगुरुमाईंचे दर्शन तर 'बुक' करू शकत नाही. श्रीगुरूंचे भौतिक सान्निध्य अशा प्रकारे मिळू शकत नाही. परंतु, दर्शन मूलतः, म्हणजे एक आध्यात्मिक अभ्यास म्हणून जर दर्शनाचा विचार केला, तर ते अशा प्रकारे *होऊ शकते.* अशा प्रकारे दर्शन *निश्चितच* मिळू शकते. श्रीगुरुमाई आपल्याला शिकवतात की, दर्शन हृदयात होते. आपल्याला अगदी इथेच, आत्ता, श्रीगुरूंच्या तेजोमय उपस्थितीचा पूर्ण अनुभव होऊ शकतो. हा अनुभव घेण्यासाठी आपल्याला कुठेही जाण्याची आवश्यकता नाही.

संतकवी कबीर यांनी रचलेले एक सुंदर भजन आहे, जे श्रीगुरुमाईंनी सत्संगांमध्ये अनेकदा गायले आहे. ते याच विषयावर आहे. कबीर साहिब या भजनामध्ये, भगवंत आणि श्रीगुरू यांच्या दृष्टिकोणातून म्हणतात :

> हे माझ्या प्रिय साधका, तू मला कुठे शोधतो आहेस?
> मी तुझ्या सोबतच आहे. मी तुझ्या समीपच आहे. मी तुझ्या हृदयात वास करतो.[१]

संतकवी या भजनामध्ये पुढे सविस्तरपणे समजावून सांगतात की, वास्तवात 'तो' मंदिरात राहत नाही, किंवा मशिदीत राहत नाही, तो काशीमध्ये अथवा कैलास पर्वतावरही राहत नाही. अवध-द्वारकेसारख्या तीर्थस्थानीदेखील तो राहत नाही. याऊलट, तो तर मनुष्याच्या विश्वासात, त्याच्या स्वतःच्या हृदयात भेटतो.

महाशिवरात्रीच्या सत्संगादरम्यान, मला असे वाटले की, आपण या प्रज्ञानाचा अभ्यास करत आहोत. मी यापूर्वीही लिहिले आहे की, ‘ॐ नमः शिवाय’ हा मंत्र भगवान शिवाचे स्वरूप आहे. मंत्रधून गाऊन आपण वास्तविकपणे भगवंताचे दर्शन घेत होतो. आपण महादेवाच्या सान्निध्यात होतो. आपण आदिगुरूंच्या समक्ष आलो होतो. आणि आपण या अनुभूतीप्रति स्वतःला ग्रहणशील करत होतो, की भगवंत, श्रीगुरू आणि आत्मा एकच आहेत.

सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवरील तुमचे विचार व चिंतनमनन वाचायला मला आवडते, त्याचे एक कारण असे आहे की, अनेकदा तुम्ही लिहिता की, श्रीगुरूंच्या उपस्थितीची अनुभूती तुम्हाला कशा प्रकारे होते, मग तुम्ही जगाच्या पाठीवर कुठेही जरी असलात, तरीही. अलीकडेच स्विट्झरलंडच्या कोनोलफिंगन येथे राहणाऱ्या एका सिद्धयोगीने ‘श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान’च्या माझ्या शृंखलेचा परिचयात्मक भाग वाचल्यावर त्यांचा अनुभव सांगितला :

> श्रीगुरुमाईंसमवेत झालेल्या महाशिवरात्री सत्संगानंतर काही दिवसांनी, श्रीगुरूंच्या भौतिक सान्निध्यात राहण्याची माझी तळमळ आणखीनच वाढली. आणि मी कल्पना करू लागलो की, प्रत्यक्ष रूपाने श्रीगुरुमाईंच्या सहवासात असणे हे किती अद्‌भुत असेल. आज, श्रीगुरुगीतेचे पठण केल्यानंतर . . . मला जाणवले की, श्रीगुरुमाई माझ्या हृदयात वास करतात—श्रीगुरुमाई, भगवंत आणि माझा परम आत्मा हे एकच आहेत. श्रीगुरुमाई याहून अधिक माझ्या निकट तर असूच शकत नाहीत!

या सिद्धयोगीने जी समज सांगितली आहे, ती अंतःप्रेरित आहे आणि *प्रेरणादायी* समजदेखील आहे. मला ही समज सशक्त करणारीदेखील वाटते. ही समज मला हे विचारण्यासाठी प्रोत्साहित करते, “आपण श्रीगुरुमाईंच्या सान्निध्याचा अनुभव सतत आपल्या हृदयात करू शकतो, या बोधाचा, या रूपांतरणकारी ज्ञानाचा उपयोग मी माझ्या जीवनात कशा प्रकारे करेन आणि आपण आपल्या जीवनात कशा प्रकारे करणार आहोत?”

त्या सात वर्षांच्या मुलीने जे सांगितले होते, ते निरागस प्रज्ञान जे तिच्या अविस्मरणीय अभिव्यक्तीमध्ये सामावलेले आहे, त्या मुद्यावर मी पुन्हा येते. ती ‘दर्शन बुक करण्या’विषयी बोलली—म्हणजे दर्शनासाठी नियोजन करण्याविषयी बोलली, एक प्रकारे ती भगवंताची ‘अपॉइंटमेंट’ घेणे म्हणजे त्यांना भेटण्याची वेळ निश्चित करण्याविषयी बोलली. कोणतीही गोष्ट जर बुक करायची असेल, तर त्यासाठी आधी संकल्प करणे आवश्यक असते. त्यासाठी आधीपासूनच नीट विचार करणे आणि योजना बनवणे गरजेचे असते. हे खरे आहे [आणि निश्चितच हा माझा अनुभवदेखील आहे] की, सिद्धयोग मार्गावर आपल्याला एकाएकी, अगदी अनपेक्षितपणे आपल्या

हृदयात श्रीगुरूंच्या सान्निध्याची जाणीव होऊ शकते. असे जेव्हा घडते, तेव्हा आपल्या आजूबाजूचे वातावरण अचानक प्रकाशात न्हाऊन निघते; जणूकाही एक स्वरतरंग निनादू लागतो, जो आपल्याला स्वतःच्या अंतरी ऐकू येतो.

परंतु आपण अधिक जागरूकतेने व नियमितपणे हा पर्यायदेखील निवडू शकतो की, आपल्याला दर्शनाचा अनुभव घ्यायचा आहे. स्वर्गलोकीचा तो तथाकथित प्रकाश आपल्यावर चमकेल आणि मग आपल्याला याचा अनुभव येईल याची आपण वाट पाहण्याची गरज नाही. आपण स्वतः पुढाकार घेऊ शकतो. आपल्या श्रीगुरूंच्या सान्निध्यात राहण्यासाठी, आपल्या हृदयात श्रीगुरूंचे दर्शन घेण्यासाठी आपण दररोज एक वेळ ठरवून, ती राखून ठेवू शकतो. दर्शनासाठी आपण नियमितपणे त्यांची अपॉइंटमेंट किंवा वेळ घेऊ शकतो! आपण आपले कॅलेंडर कितीतरी अपॉइंटमेंटस्, भेटी आणि कार्यक्रमांनी भरतो, त्याविषयी जरा विचार करून पाहा. मग दर्शनदेखील त्यांपैकी एक का बनवू नये? दर्शनाला सर्वात खास आणि एक अनिवार्य अपॉइंटमेंट का बनवू नये?

गेल्या वर्षी आपण या गोष्टीचे निरीक्षण केले की, आपण आपल्या वेळेचा उपयोग ज्या प्रकारे करतो, त्यावरच आपल्या जीवनाचे स्वरूप आणि त्याची दिशा अवलंबून असते. आपल्याला स्वतःच्या जीवनातील दैनिक कर्तव्ये पार पाडायची आहेत, वैयक्तिक आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडायच्या आहेत. आपण आपल्या वेळेच्या संदर्भातदेखील असे निर्णय घेऊ शकतो, ज्यायोगे आपण आपल्या जीवनाच्या वर्तमान दिनचर्येमध्येसुद्धा मांगल्याची वृद्धी करू शकू.

हे सगळे सांगून झाल्यावर आता मी हे तुमच्यावर सोपवते. तुम्हाला श्रीगुरुमाईंचे दर्शन घ्यायचे आहे असा विचार जेव्हा तुम्ही करता आणि तुम्हाला स्वतःसाठी श्रीगुरुमाईंचे ‘दर्शन बुक’ करण्याची इच्छा जेव्हा असते, तेव्हा तुमच्यासाठी दर्शनाचा काय अर्थ असतो? तुम्ही दर्शनापासून एका विशिष्ट लाभाची अपेक्षा करता का? की तुम्ही दर्शनाची जादू त्याच प्रकारे प्रकट होऊ देता, जशी ती होईल?

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

[1] मोको कहाँ तू ढूँढ़े बन्दे, इंग्रजी भाषांतर © २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®.